जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 JAN 2018
तरुण भारत

# विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. पवार उत्तम प्रशासक



कोल्हापूर : डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत माजी कुलसचिव डॉ. बी. पी. साबळे, डॉ. बी. एल. पाटील, डॉ. एस. जे. नाईक आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचा सामान्य कुटुंबात जन्म झाला. त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण मिळावे, म्हणून जागतिक पातळीवरील शिक्षकांची नेमणूक केली. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून पारदर्शक कारभार केला. त्यांच्या उत्तम प्रशासकीय कामामुळेच विद्यापीठाच्या प्रगतीचा आलेख उंचावत गेला, असे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी. पी. साबळे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी भवनमधील आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. विद्यापीठाच्या अतिथीगृहासमोरील व विद्यार्थी भवन येथील डॉ.आप्पासाहेब पवार यांच्या पुतळयास कुलसचिव डॉ विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी. पी. साबळे यांचे मत**

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रशासकीय कार्यपध्दतीवर संशोधनात्मक काम होण्याची आवश्यकता आहे. यावेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. बी. एल. पाटील, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. तुकाराम सरगर, डॉ. मानसिंग जगताप, डॉ. सी. ए. लंगरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. पी. व्ही. अनभुले, डॉ. एम. एस. निंबाळकर आदी उपस्थित होते.

2 JAN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमी खर्चात पाणी शुद्ध करणारी 'लाईफ बॉटल'

## शिवाजी विद्यापीठातील संशोधन; वाळू, कोळसा, कापसाचा वापर करुन शुद्धीकरण

**संतोष मिठारी ।**
**लोकमत न्यूज नेटवर्क**

**कोल्हापूर :** वाळू, कोळसा, कापूस आदी साहित्याच्या माध्यमातून कमी खर्चात आणि घरी बनविता येणारी पाणी शुद्ध करणारी 'लाईफ बॉटल' शिवाजी विद्यापीठात साकारली आहे. विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातील विद्यार्थी विनायक महादेव साळुंखे याने संशोधनातून या होममेड वॉटर प्युरिफायरची निर्मिती केली आहे.

शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी सर्वांसाठी महत्त्वाचे आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थी विनायक साळुंखे याने कमी खर्चात वॉटर प्युरिफायर साकारण्यासाठी दोन महिन्यांपासून संशोधन सुरु केले. यातून त्याने दोन लिटरची रिकामी प्लास्टिक बॉटल, मोठी वाळू, बारीक वाळू, लाकडी कोळसा (चूर्ण स्वरुपात), कापूस यांच्या वापरातून 'लाईफ बॉटल' साकारली आहे. यासाठी अवघा ५० रुपये खर्च झाला आहे.

या 'लाईफ बॉटल'मुळे कमी खर्चात पाणी शुद्ध करता येते. शिवाय ती वापरण्यास सोपी आहे. हा वॉटर प्युरिफायर बनविणारा विनायक सध्या एम. एस्सी.च्या दुसऱ्या वर्षात शिकत



आदित्य वेल्हाळ

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठातील एम. एस्सी. पर्यावरण शास्त्राच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी विनायक साळुंखे याने कमी खर्चातील 'लाईफ बॉटल' या वॉटर प्युरिफायरची निर्मिती केली आहे.

आहे. मिरजवाडी (ता. वाळवा, जि. सांगली) त्याचे मूळ गाव आहे. या संशोधनात त्याला विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आसावरी जाधव, पल्लवी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

### दूषित पाणी समस्येवर उपाय

युनायटेड नेशनच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी सर्वांना शुद्ध पाणी मिळणे गरजेचे आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार दरवर्षी ३५ लाख बळी या दूषित पाण्यामुळे होत आहेत. भारताचा विचार करता ६४ लाख लोकांना आजही शुद्ध पिण्याच्या पाण्यावाचून वंचित राहावे लागत आहे. दूषित पाण्यामुळे होणाऱ्या रोगांना रोज बळी पडण्याऱ्या लोकसंख्या दोन हजारांच्या घरात आहे. या दूषित समस्येवर उपाय म्हणून हा 'लाईफ बॉटल' ही उपयुक्त ठरु शकते, असे विनायक साळुंखे याने सांगितले. या संशोधनांची विद्यापीठातील आविष्कार महोत्सवात मांडणी केली आहे. या संशोधनाची व्याप्ती वाढवून भविष्यात जलशुद्धिकरण यंत्र तयार करण्याचे नियोजन असल्याचे त्याने सांगितले.

" दुर्गम, ग्रामीण भागासाठी हा होममेड वॉटर प्युरिफायर उपयुक्त ठरणारा आहे. त्याद्वारे पाण्यातील गढूळ पदार्थ, जीवांणूचे प्रमाण बऱ्यापैकी कमी करता येते. त्याच्या निर्मितीसाठी अवघे ५० रुपये खर्च येतो शिवाय विजेशिवाय तो कार्यान्वित असल्याने सर्वसामान्यांना परवडणारा देखील आहे.

**- डॉ. आसावरी जाधव,**
**सहाय्यक प्राध्यापिका,**
**पर्यावरणशास्त्र विभाग**

### 'लाईफ बॉटल'


पहिल्यांदा प्लास्टिकच्या बॉटलचा तळ समांतर कापून घ्यावा. त्यानंतर कापलेली बाजू वर करुन उलटी बॉटल उभी करावी. कापसाच्या बोळ्याने त्याचे टोपणाची बाजू बंद करावी. त्यावर आधी कोळशाचे चूर्ण आणि यानंतर बारीक वाळू समांतर पसरुन घ्यावी. त्यावर मोठ्या वाळूचा थर पसरुन घ्या. आता वरुन पाणी ओतल्यानंतर त्याचे निचरा होऊन जाऊ द्या, जोपर्यंत स्वच्छ पाणी येत नाही तोपर्यंत पाणी वाहू द्या. त्यानंतर हा वापरण्यासाठी तयार होईल.

- 2 JAN 2018 महाराष्ट्र टाइम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे यांच्या समाजप्रबोधनाची चिकित्सा

■ डॉ. अरूण शिंदे
नाइट कॉलेज, कोल्हापूर

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील म. शिंदे अध्यासनाच्या वतीने रा. ना. चव्हाण लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन भाग दोन' हा ग्रंथ डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते प्रकाशित होत आहे. त्यानिमित्त...**




रा. ना. चव्हाण यांचे 'म. शिंदे - एक दर्शन भाग एक' हे पुस्तक २०१७ मध्ये प्रकाशित झाले. यामध्ये समाविष्ठ लेखांव्यतिरिक्त उर्वरित लेखांचे संकलन करून 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन भाग दोन' हा ग्रंथ रमेश चव्हाण यांनी संपादित केला आहे. म. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध आयाम उलगडून त्यांच्या विचारकार्याची ऐतिहासिक मौलिकता 'आज'च्या संदर्भात अधोरेखित करणे हे या ग्रंथाचे मुख्य प्रयोजन आहे.

प्रस्तुत ग्रंथातील लेखन दोन भागांमध्ये विभागलेले आहे. पहिल्या भागात महर्षी शिंदे यांच्या जीवनकार्याचे दर्शन घडते. दुसऱ्या भागात २३ परिशिष्टे दिली आहेत. या साऱ्या लेखनांमधून महर्षींच्या कार्यविचारांचे मूलगामी दर्शन घडण्याबरोबरच त्यांच्या चरित्राच्या अभ्यासाचे महत्त्वपूर्ण संदर्भ उपलब्ध होतात. म. शिंदे यांच्या जीवनकार्याचे साक्षेपी अभ्यासक व समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांची अभ्यासपूर्ण विश्लेषक प्रस्तावना ग्रंथास लाभली आहे. रा. ना. चव्हाण यांच्या म. शिंदेविषयक लेखनाची कालोचित समीक्षा करण्याबरोबरच आजच्या व उद्याच्या संदर्भातील प्रस्तुतता डॉ. शिंदे यांनी सिद्ध केली आहे. म. शिंदे व रा. ना. चव्हाण या गुरुशिष्यांचे वैचारिक भावबंध उलगडणारी व त्यांची महत्ता विशद करणारी ही प्रस्तावना आवर्जून वाचण्याजोगी आहे.

या ग्रंथाच्या पहिल्या भागामध्ये म. शिंदे यांचा जीवनपट, त्यांचे ब्राह्मधर्म प्रचारकार्य, अस्पृश्यता निर्मूलन, शेतकरी आंदोलने, राजकीय व सामाजिक भूमिका, राष्ट्रीय दृष्टी, मराठा समाजविषयक भूमिका, सत्याग्रह, तुरुंगवास, विचारविश्व, द्रष्टेपण अशा अनेक मुद्द्यांची चिकित्सा करणारे लेख समाविष्ट आहेत.

**निमित्त**

सदरचे लेख प्रसंगोपात्त लिहिल्याने त्यात पुनरुक्ती आढळते. परंतु म. शिंद्यांच्याविषयी जिवंत आस्था, समाजप्रबोधनाची आच, तटस्थ विवेचन व साधी सोपी सुबोध भाषा यांमुळे रा. नां. चे लेखन वाचनीय झाले आहे. म. शिंदे यांचे वाई व सातारा परिसरातील कार्य विशद करणाऱ्या लेखांमधून या परिसरातील सामाजिक इतिहासाचे आजवर अज्ञात संदर्भ उजेडात आले आहेत. म. शिंदे व सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ यांच्या परस्परसंबंधावरही रा. नां. नी प्रकाश टाकला आहे. 'शिंदे सत्यशोधक समाजावर बोलू लागले म्हणजे सत्यशोधक समाजाला तत्त्वज्ञानाचे स्वरूप येई. शिंदे तत्त्वचिंतक, योजक, संघटनाकुशल, व्यवहारात चतुर व मूलभूत अर्थाने राजकारणी होते' अशी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी चरित्रकोशामध्ये नोंद केली आहे. सत्यशोधक समाजाला लागलेले अनिष्ट वळण नाहीसे होऊन त्याला उन्नत, उदात्त स्वरूप यावे, यासाठी शिंदे कसे प्रयत्नरत होते, हेही रा. नां. नी दाखवून दिले आहे. प्रार्थना समाजातील विचारवंतांपेक्षा शिंद्यांचे वेगळेपण, त्यांची संप्रदायातीत दृष्टी रा. नां. नी मांडली आहे. शिंदे यांनी स्थापन केलेल्या संस्था, त्यांचे साहित्य इत्यादींवरही भाष्य केले आहे. तौलनिक लेखनशैली हे रा. ना. चव्हाण यांचे वैशिष्ट्य. लोकहितवादी, म. फुले, शाहू महाराज, धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव जेधे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींच्या विचारकार्याशी शिंद्यांची तुलना करून त्यांच्यातील साम्यस्थळे अधोरेखित केली आहेत. गुणांचा गुणाकार करून विवेकनिष्ठ समूहभान असणारा समाज निर्माण करण्याची व्यापक भूमिका शिंदे व रा. ना. चव्हाण यांनी घेतलेली आढळते. शिंदे यांच्या विचारांचे सूत्रबद्ध दर्शनही 'विठ्ठलवाणी' या लेखामध्ये घडविले आहे.

प्रस्तुत ग्रंथाला जोडलेली २३ परिशिष्टे महत्त्वाची आहेत. म. शिंदे यांचे वाईतील वास्तव्यकार्य, वाई तालुक्यात ब्राह्म धर्माच्या प्रचारार्थ केलेले दौरे, म. शिंदे यांच्यावरील आठवणी, जनाबाई शिंदे यांचे वाईतील कार्य विशद करणारा कृष्णाबाई जव्हेरे यांचा लेख तसेच म. शिंदे यांची काही भाषणे आणि महर्षींच्या हस्ताक्षरातील पत्रव्यवहार वगैरे परिशिष्टामध्ये समाविष्ट केलेला आहे. म. शिंदे यांनी वाई ब्राह्म समाजाचे सेक्रेटरी रा. कृ. बाबर यांना लिहिलेली स्वहस्ताक्षरातील २१ पत्रे ग्रंथाचे संदर्भमूल्य वाढवतात.

म. शिंदे यांच्या विचारकार्याचा समग्र अभ्यास करण्याची दृष्टी रा. नां. चे लेखन देते. तसेच वर्तमान व भविष्याच्या वाटचालीसाठी महर्षींचा विचारमार्ग कसा दिशादर्शक आहे यावरही भाष्य करते. महर्षी शिंदे तसेच महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचा इतिहास अभ्यासण्यासाठी या ग्रंथाचे संदर्भमूल्य वादातीत आहे.

2 JAN 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संकल्प नवीन वर्षाचा...

प्रतिनिधी
कोल्हापूर

२०१८ या नववर्षानिमित्त विविध क्षेत्रात कार्यरत व्यक्तींनी काही संकल्प केले आहेत. कोणी नवीन वर्षात स्वत:चे घर, स्वत:ची गाडी घेण्याचा तर काहींनी नवा उद्योग उभारणीचा संकल्प केला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपले प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शी बनवण्याचा संकल्प सोडला आहे. तर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कारभारी, जनतेचे सेवक आणि पुढाऱ्यांनी विविध नाविण्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून आपल्या भागाचा सर्वांगिण विकास करण्याचा दृढ निश्चिय केला आहे. शिक्षण क्षेत्र असो वा आरोग्य क्षेत्र असो, या क्षेत्रातील विचारवंत, तज्ञ व धोरण राबवणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नागरिकांना लोकाभिमुख सेवा आणि सुविधा पुरवण्याचा संकल्प यानिमित्ताने केला आहे.

## प्लास्टिकमुक्त शहर



शहरात १४ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीवेळी नाले व ड्रेनेजलाईन तुंबल्याने अनेकांच्या घरांमध्ये पाणी शिरले होते. यामध्ये प्रचंड नुकसान झाले होते. नाले सफाईमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्यांमुळे ड्रेनेजलाईन तुंबल्याचे समोर आले आहे. तसेच शहरातील कचऱ्यामध्ये बहुतांशी प्लास्टिकचा कचरा असतो. त्यामुळे प्रदूषणमुक्तीसाठी शहर प्लास्टिकमुक्त करणे हा संकल्प असणार आहे. अंबाबाई मंदीरामध्ये दर्शनासाठी दररोज हजारो भाविक कोल्हापुरात येत आहेत. नियोजनाअभावी शहरातील वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे. काही ठिकाणची सिग्नल व्यवस्था नादुरुस्ती असल्यामुळे तसेच पार्कींगचे नियोजन नसल्यामुळे वाहतुक व्यवस्थेवर प्रचंड ताण पडत आहे. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. यामध्ये सुधारणा करण्यासाठी आपले प्राधान्य राहणार आहे. कसबा बावडा येथील झूम प्रकल्पातील कचरा उठाव करून वीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्याचा संकल्प असणार आहे.

**महापौर स्वाती यवलुजे**


## विद्यार्थ्यांना उद्योगधंद्यासाठी प्रोत्साहन



शिवाजी विद्यापीठ जागतिक पातळीवरील स्पर्धेत सहभागी झाले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यापीठाचा मानदंड उंचावण्याचा प्रयत्न करणार आहे. गुगलबरोबर झालेल्या सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे शिक्षण देऊन विविध आयटी कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून दिला जाईल. तसेच कौशल्यावर आधारित विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना उद्योगधंद्यासाठी प्रोत्साहन देण्याचा विद्यापीठाचा नवसंकल्प आहे.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

## पंचगंगा प्रदूषणमुक्त करण्याचा प्रयत्न



अमृत योजनेतून शहरासाठी ६७ कोटींचा निधी मिळाला आहे. या माध्यमातून शहर, उपनगरातील ड्रेनेजलाईन बदलणे व नवीन टाकण्याचे काम सुरु झाले आहे. याचबरोबर दुधाळी येथे सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम अंतिम टप्प्यात आहे. या माध्यमातून पंचगंगा प्रदूषणमुक्त करण्याचा प्रयत्न केला जाईल. याचबरोबर १५ दिवसांमध्ये अंबाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिखर समितीसमोर सादरीकरण करण्यात येणार आहे. यानंतर महापालिकेला ७० कोटींचा निधी मिळणार आहे. या निधीतून व्हिनस कॉर्नर व सरस्वती टॉकीज परिसरात भक्ती निवास व बहुमजली पार्किंगची सुविधा देण्यात येणार आहे. तसेच बिंदू चौक ते भवानी मंडप मार्गावर पदपथ तयार करण्याची कामे हाती घेण्यात येणार आहेत. ही काम निर्धारीत वेळेत पूर्ण करण्याचा संकल्प राहील. याचबरोबर थेटपाईपलाईन योजनातील त्रुटी दूर करून मुदतीमध्ये काम पूर्ण करण्यासाठी प्राधान्य राहिल. सावित्री बाई फुले रुग्णालयात अतिदक्षता विभाग सुरु करणार.

**मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी**

## ग्रामपंचायत, आरोग्य व शिक्षणावर अधिक भर

ग्रामपंचायत हा पंचायत राज व्यवस्थेचा पाया आहे. ग्रामीण भागातील जनतेसाठी राबविल्या जाणाऱ्या सर्व शासकीय योजना ग्रामपंचायतींमार्फत राबविल्या जातात. विविध विकासकामांसाठी आवश्यक असणारा निधी थेट ग्रामपंचायतींना दिला जात आहे. त्यामुळेच ग्रामपंचायतींना सक्षम करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. यासाठी आगामी वर्षभरात ग्रामसेवकांना सर्वांगिण दृष्ट्या प्रशिक्षित केले जाणार आहे. विविध प्रकारचे दाखले देण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करून ग्रामपंचायत प्रशासन अधिक सक्षम करण्यावर नवीन वर्षात भर राहणार आहे. आरोग्य व शिक्षण विभागामध्येही नाविण्यपूर्ण योजना राबवून लोकांना चांगली सेवा पुरविण्याचा संकल्प असल्याचे जिल्हा परिषद सीईओ डॉ. कुणाल खेमनार यांनी सांगितले.

ग्रामपंचायतींना सक्षम करण्यासाठी ग्रामसेवकांना सर्व योजनांची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षित केले जाणार आहे. ग्रामसेवकास आठवड्यातील बहुतांशी कालावधी ग्रामपंचायतीमध्ये उपस्थित राहता येईल याबाबत प्रयत्न केले जातील.



त्यांना काही महत्वाची कामे वगळता इतर कामांसाठी पंचायत समिती अथवा मुख्यालयामध्ये बोलावले जाणार नाही.

आरोग्य व शिक्षण हे दोन महत्वाचे विभाग आहेत. या विभागातील कामकाज अधिकाधिक गतिमान करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्याचा जि.प.चा संकल्प आहे. तसेच ग्रामीण विकास यंत्रणेतर्फे राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजना, बचत गट, शिक्षण, आरोग्य, पाणी या विभागांना प्राधान्य दिले जाणार आहे. नवीन वर्षात लोकसहभागातून सीएसआर निधी वाढविण्यासाठी अधिक प्रयत्न करणार असून डीपीडीसी व सेस फंडातून मिळणारा निधी वेळेत खर्च करणार असल्याचे डॉ. खेमनार यांनी स्पष्ट केले.

**– जि. प. चे सीईओ डॉ. कुणाल खेमनार**